हमारा महानगर

मुंबई, पुणे और नाशिकसे एक साथ प्रकाशित

# नानावटी अस्पताल ने किडनी ट्रांसप्लांट में पाई सफलता

**मुंबई।** मुंबई के नानावटी हॉस्पिटल ने किडनी ट्रांसप्लांट में बड़ी सफलता पाई है और इस वर्ष उसने 4 किडनी ट्रांसप्लांट सफलतापूर्वक किए है। किडनी का सफलतापूर्वक ऑपरेशन डॉक्टर शरद सेठ की अगुवाई में किया गया। नानावटी हॉस्पिटल में विजय जोशी जो कि हेपेटाइटिस सी की बीमारी से ग्रसित थे और उन्होंने जिंदगी जीने की आस छोड़ दी थी, लेकिन नानावटी अस्पताल के डॉक्टर सेठ ने अपनी टीम के साथ मिलकर सफलता पूर्वक किडनी को ट्रांसफर करने का कार्य किया ।

तरुण भारत

# ...अन् १३ वर्षानंतर त्यांना मिळाली किडनी

## तेरा वर्षापासून डायलिसिसद्वारे होते उपचार सुरू; अवयवदानाच्या चळवळीतून किडनीचा लाभ

प्रतिनिधी
मुंबई

घरची बेताची स्थिती... कामही सिक्युरिटी गार्डचे... किडनीच्या त्रासाने ते त्रासले होते. किडनी मिळाल्यास पुढील जीवन सुसह्य होईल असा इशारा देखील डॉक्टरांनी दिला. त्यामुळेच तब्बल तेरा वर्षे ते किडनीच्या शोधात होते. गुरुवारी मात्र त्यांना ब्रेनडेड अवस्थेत गेलेल्या ४४ वर्षांच्या महिलेने किडनी दान केली. नानावटी रुग्णालयात किडनी प्रत्यारोपण झाल्याने त्यांनी सुटकेचा श्वास सोडला.

सध्या अवयवदान चळवळ जोमात सुरू आहे. अवयवदानाबाबत एवढी जागरूकता याआधी नव्हती. सध्या मृत्यू येण्याआधी अवयवदान व्हावे यासाठी बहुतांशजण समोर येत आहेत. तर



मृतांचे नातेवाईक देखील पारंपरिकतेचा विचार न करता अवयवदान करत आहे. अवयवदानाचे महत्त्व सांगणारा प्रसंगच त्यादिवशी घडला. नानावटी रुग्णालयात किडनीसाठी गरजू असलेल्या ४९ वर्षांच्या रुग्णाने नाव नोंद केले होते. हे सिक्युरिटी गार्डचे काम करतात. घरातील बेताची स्थिती असल्याने फक्त डायलिसिस करू शकत होते. डॉक्टरांनी तर त्यांना नव्या किडनीची गरज किती महत्त्वाची आहे हे सांगितले होते. त्यामुळे तेरा वर्षांपासून त्यांनी तशी नोंदही केली होती. वेळ निघून जात होता. मात्र, त्यांना किडनी मिळत नव्हती. दरम्यान, तेरा वर्षे ते सतत डायलिसिसचा उपचार घेत होते.

रहेजा रुग्णालयातील ब्रेनडेड अवस्थेत गेलेल्या महिलेच्या नातेवाईकांनी किडनीदान करणार असल्याचे एमएसडब्ल्यू प्रकाश यांना समजल्यानंतर त्यांनी किडनीची माहिती गरजूंना सांगितली. 'त्यांची आर्थिक स्थिती आणि महिन्याला डायलिसिसचा होणारा खर्च पाहता ते गरजू होतेच. शिवाय त्यांनी तेरा वर्षांपूर्वीच नोंद केल्याने त्यांना किडनी देणे भाग होते. अवयवदानाची प्रक्रिया संथ आहे मात्र यशस्वी आहे. अवयवांसाठी फार वर्षे वाट पहावी लागत असल्याचे प्रकाश यांनी सांगितले.

आमच्याकडे महिन्याला ५० ते ६० किडन्यांसाठी नावे नोंद होत असतात. तुलनेत मात्र महिन्याला ५ ते ६ किडन्या उपलब्ध होतात. म्हणजेच मागणी आणि पुरवठा यात १० टक्क्यांचा फरक अद्याप असल्याचेही प्रकाश यांनी सांगितले. अवयवदान चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी ग्रामीण पातळीवर देखील उपक्रम हाती घेणे गरजेचे असल्याचे केईएम रुग्णालयाच्या डॉ. कामाक्षी माटे यांनी सांगितले. शहर परिसरात याबाबत बऱ्यापैकी जागरूकता असून ग्रामीण भागात देखील अवयवदान वाढणे गरजेचे असल्याचे डॉ. माटे यांनी सांगितले.